# वंदे मातरम्

**स्मिता भागवत**

भारतीय गणतंत्राचा अंमल सुरु झाला त्यास साठ वर्षे पूर्ण होऊन गेली आहेत. पण स्वराज्य सुराज्य झालेले नाही, ही कटू वस्तुस्थिती! वाजवी कारणाने सज्जन देश सोडत आहेत. काही वर्षांपासून, पंधरा ऑगस्ट व सव्वीस जानेवारीच्या आसपास, बुद्धिप्रामाण्यवादी म्हणवणाऱ्या निवासी आणि अनिवासी भारतीय प्रजाजानांत एक ई-मेल - ई-पत्र फिरत असते. राष्ट्रगीताच्या संदर्भात, रिझोल्युशन वाटावे असे! "'जन गण मन' गीत, किंग जॉर्जच्या स्वागतासाठी नतद्रष्ट इंग्रजांचे लांगुलचालन करण्यासाठी रचले आहे. म्हणून 'वंदे मातरम्' आपले राष्ट्रगीत असावे." त्यास अनुमोदन सुचवणाऱ्या सह्या असतात. ते पाहून मी चक्रावते. सही करताना, अनुमोदन देता यावे इतकी माहिती आपल्यापाशी आहे का, हा प्रश्न त्यांना पडत नाही, याचे मला नवल वाटते.

माझे आई-वडील आणि श्वशुर यांनी स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी लाठ्या झेलल्या. कारावास पत्करला. देश स्वतंत्र झाल्यावर देशभक्तीस व्यवसाय न ठरवता ते संसाराला लागले. जन्मदात्यांनी विचार, वाचन आणि 'जे जे आपणासी ठावे ते ते लोकांना सांगावे,' ('शिकवावे' म्हणण्याजोगी मी स्वत:स समर्थ व्यक्ती समजत नाही.) हा संस्कार मला बाळगुटीत दिला. त्यामुळे आपली पाळेमुळे जाणणे महत्वाचे आहे हे माझे प्रांजळ मत झाले. झाडे असोत की व्यक्तिमत्त्वं! मुळे छाटण्याची परिणीती 'बोन्साय' असते, असे मी समजते. पुढची पिढी चहू अंगाने फुलावी, त्यांचे बोन्साय होऊ नयेत, या तीव्र इच्छेतून या माहितीप्रद लेखाचा जन्म झाला आहे.

संघराज्याची स्थापना होण्यापूर्वी राष्ट्रगीताचा प्रश्न नव्हता. देशात छोटी-मोठी राज्ये होती. प्रत्येक राज्याचे ध्वज, मुद्रा आणि राष्ट्रगीत होते. ब्रिटीशांचा एकछत्री अंमल सुरु झाल्यावर त्यांनी समस्त प्रजेवर, 'God save the Queen' हे राष्ट्रगीत लादले. पण ते यशस्वी झाले नाहीत. १८९६ च्या कलकत्ता कॉंग्रेसच्या खुल्या अधिवेशनाची सुरुवात, आव्हान दिल्यागत गुरुदेव रविंद्रनाथ टागोर यांनी 'वंदे मातरम्'च्या उद्घोषाने केली. हे गीत प्रकाशित झाल्याला आणि जनतेने ते नाकारल्याला तोवर वीस वर्षे झाली होती. गुरुदेवांनी जणू शब्दात प्राण फुंकले. जनतेने अक्षरशः रोमांचाचा चमत्कार अनुभवला.

बंकिमचंद्र चटर्जी या गीतप्रसवाच्या संदर्भात लिहितात, "१८७५च्या सात नोव्हेंबर – दुर्गाष्टमीचा सण! रात्री मी नावेतून प्रवास करत होतो. अनायासे माझी नजर क्षितिजाकडे वळली. सूर्योदयाचा संकेत मिळत असताना, मी उन्मनी अवस्था गाठली. मला जलात भारतमाता दिसली. गूढरम्य! दुर्गामातेगत भुजा फैलावलेली! पण तिच्या सर्व हातात, आभूषणांच्या जागी साखळदंड होते. मी अस्वस्थ झालो न झालो तोच मला खळखळाट जाणवला. मी चमकलो. बघितले तर साखळदंड तोडून मातृभूमी तेजस्वी शस्त्रे

धारण करती झाली होती. सिंहारूढ मातेच्या पायदळी शत्रू पाहून मी शहारलो. महाशक्तीस वंदन करण्यास हात जोडले नि नकळत मी उद्गारलो, 'वंदे मातरम्!' त्या उन्मनी अवस्थेत माझ्या तोंडून पूर्ण गीत घरंगळले."

त्यावेळी बंकिमचंद्र जिल्हाधिकारी होते. त्यांचे बंधू संजीबचंद्र यांचे 'वंगदर्शन' नावाचे साप्ताहिक होते. लिखाणात या बंधुंचा सिंहाचा वाटा असे. बंकिमजींच्या 'दुर्गेशनन्दिनी' वगैरे कादंबऱ्या त्यात धारावाहिक रूपाने प्रकाशित झाल्या. अंक मुद्रित होत असताना कधी छोटी-मोठी जागा उरत असे. ती भरण्यासाठी पानपूरके ठरण्याजोगे लिखाण, मेजाच्या खणात (Drawer) असे. गरजेनुसार ते घ्यावे, अशी कामगारांना सूचना होती. तसे 'वंदे मातरम्' गीत वापरले गेले. पुढे 'आनंदमठ' या कादंबरीत बंकिमजींनी ते समाविष्ट केले. त्यावेळी गीतासाठी मेघमल्हार राग पसंत केला होता.

गीताची निर्मिती झाली तेव्हा ते कुणाला आवडले नाही. खुद्द त्यांच्या मुलीने 'न संस्कृत न बंगाली! अगदी धेडगुजरी गीत!' असे म्हणत नाक मुरडले. आग्या वेताळ संचारल्यागत समीक्षकही तुटून पडले. हे गीत कुणी गाण्याचे धाडस करणार नाही, अशी त्यांच्या मुलीने कडवट खात्री व्यक्त केली . सर्वत्र चेष्टा होत होती तरी बंकीमजी स्वस्थ होते. लोक खनपटीस बसले, तेव्हा ते म्हणाले, "या गीताचे महात्म्य उमगावे, अशी आज कुणात क्षमता नाही. काळाच्या गर्भात काय दडले आहे ते सांगणे योग्य नसते. तरी मी खात्रीपूर्वक सांगतो, भविष्यात या गीताचा आशय समजण्याची कुवत निर्माण होईल. गीत अक्षरमंत्ररूप धारण करील. अवश्य मंत्ररूप ठरेल."

स्वातंत्र्यसमरात हे गीत मंत्रासारखे परिणामकारक ठरले. 'वंदे मातरम्' शब्द ऐकताच प्रजेचा ऊर आदर आणि अभिमानाने भरून येई. राज्यकर्त्यांनी धास्ती घेऊन 'वंदे मातरम्' म्हणण्यावर बंदी लादली. पण कारागृहे भरली तरी 'वंदे मातरम्' हा उद्घोष शमला नाही. या मंत्रात प्रेतात प्राण फुंकण्याचे सामर्थ्य आहे, असे म्हटले जाई. भगतसिंग, सुखदेव, राजगुरु... कित्येक देशभक्त 'वंदे मातरम्' हा उद्घोष करीत फाशी गेले.

निर्मितीक्षम व्यक्तीत द्रष्टेपण असते. बंकीमबाबुंच्या भविष्यवाणीनुसार त्यांची निर्मिती मंत्ररूप बनली. पण १८९६ नंतर छेडलेल्या आंदोलनात! लोकांना या गीताचे महत्व पटवण्यासाठी गुरूदेवांचा परिसस्पर्श व्हावा लागला; यास इतिहास साक्षी आहे. स्वातंत्र्य मिळाल्यावर तयार झालेले 'वेद मंत्राहून आम्हा वंद्य वंदे मातरम्' हे ग.दि.मां.चे पु.ल. व सुनिताबाईंवर चित्रित केलेले गीतही अजरामर झाले, यासही!

जे गाण्याचे साहस कुणी करणार नाही, असे त्यांची कन्या म्हणाली आणि समीक्षकांनी त्यास दुजोरा दिला, ते गीत स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्रोत्तर काळात आदराने विविध बंदिशींच्या रुपात सादर झाले. सुभाषचंद्र

बोस यांना आझाद हिंद सेनेत वीररस निर्माण करण्यासाठी ते हवे वाटले. म्हणून श्री. तिमिर बरेन यांनी ते दुर्गा रागात स्वरबद्ध केले. पंडित ओमकारनाथ ठाकूर, पंडित भीमसेन जोशी, पंडित जसराज, एम.एस. सुबलक्ष्मी, केशवराव भोळे, मास्टर कृष्णराव, इत्यादी शास्त्रीय गायक ते नौशाद, ए.आर. रहेमान पर्यंत ही यादी वाढते. आनंदमठ चित्रपटात सुरश्री लता मंगेशकर आणि हेमंत कुमार यांनी गायिलेले गीत इतक्या वर्षानंतरही रोमांचक वाटते. दूरदर्शन व आकाशवाणीवर सादर होणारी धून पंडित रविशंकर यांची आहे.

हे गीत आपले राष्ट्रगीत असेल, अशी बहुतेकांची अटकळ! ते घडले नाही. दिग्गज व्यक्तीच्या वशिल्याचा हा सवंग किस्सा नव्हता. साधक-बाधक विचारांती घेतलेला तो सुयोग्य निर्णय! टीकेचा सोपा मार्ग टाळून, तर्कशुद्ध मीमांसा जाणून घेतली तर पुर्वाग्रहाचे उच्चाटन व्हावे असा! त्या काळच्या पुढाऱ्यांविषयी आदर निर्माण व्हावा असा!

'वंदे मातरम्' या संस्कृत बंगाली गीताने इतिहास घडवला; हे खरे असले तरी या गीताच्या निर्मितीच्या मुळाशी दुर्गेचे स्तवन होते. म्हणून मुस्लीम लीगने त्यास विरोध केला. धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा अनुरोध करणाऱ्या राष्ट्राचे राष्ट्रगीत पक्ष, भाषा वा धर्माचे नसावे, असे त्यांचे म्हणणे! पण समंजस नेत्यांनी, दुर्गामाता मातृभूमीच्या रुपात प्रगट झाली, याकडे बोट दाखवले. पाच कडव्यातील अर्थाकडे लक्ष वेधून, या नेत्यांनी हे हिंदुधर्माचे प्रार्थनागीत नाही, हे सिद्ध केले. निखळ देशभक्तीपर गीत असल्यानेच, जाती-धर्माच्या गुंत्यात न गुंतता, ते सर्व देशभक्तांसाठी प्रेरक ठरले; हे सिद्ध करूनच 'जन गण मन'ला राष्ट्रगीताचा दर्जा देण्यात आला. कारण....

राष्ट्रगीतास आचारसंहिता असते. 'वंदे मातरम्' समस्त नागरिकांच्या हृदयात होते. लोकांनी विविध ढंगात मनःपूर्वक गाइले होते. लोकप्रिय गीतास, आचारसंहितेत बांधणे समंजस नेत्यांना अयोग्य वाटले. विशेषत: तेव्हढ्याच तोलाचे 'जन गण मन' उपलब्ध असताना! म्हणून 'वंदे मातरम्'ला 'राष्ट्रीयगीत' आणि 'जन मन गण'ला राष्ट्रगीताचा सन्मान प्रदान करणे योग्य ठरवले.

'जन मन गण' हे गीत किंग जॉर्जच्या सन्मानार्थ लिहिले, व 'भारतभाग्यविधाता' शब्द पंचम जॉर्जचा गौरव करण्यासाठी आहे, हे हीन आरोप किती हास्यास्पद आणि बिनबुडाचे आहेत, त्यावर लक्ष केंद्रित करू. राजकारण आपला प्रांत नाही, असे म्हणणाऱ्या गुरुदेव टागोरांनी, नागरिक या नात्याने 'वंदे मातरम्' हे गीत गाईले. 'जन गण मन' गीत खुद्द त्यांची निर्मिती! या कवनात समग्र भारतभूमीचे दर्शन होते असे डॉ. राजेद्र-प्रसादजींना वाटले. 'भारतभाग्यविधाता' म्हणजे पंचम जॉर्ज, असा त्या वेळच्या 'सो कॉल्ड' सुशिक्षितांनी बादरायण संबंध जोडला. त्याचे पडसाद, त्याच पठडीतील सुशिक्षित म्हणवणाऱ्या उथळ लोकांत अजून उमटत आहेत. जालियानवाला बागेच्या क्रूर घटनेनंतर, राजकारणात सक्रीय नसूनही इंग्रजांनी दिलेला 'सर' किताब गुरुदेवांनी परत केला. त्या गुरुदेवांवर, पंचम जॉर्जच्या लांगुलचालनाचा आरोप? हा पोरकटपणाचा कडेलोट आहे! हे तर्काचे नाते तोडणे नि अकलेचे तारे तोडणेही! त्यास

अनुमोदन देणारे स्वतःस सुशिक्षित म्हणवणारे माहितीशून्य निवासी आणि अनिवासी भारतीय! त्यांच्या देशप्रेमाची(?) तुलना, गुरुदेवांशी! गेल्या शतकातून या शतकात आलेला हा थिल्लर विनोद! उथळ पाण्याचा खळखळाट!

वास्तविक पंचम जॉर्जच्या स्वागत समारोहात हे गीत गाणे हे गुरुदेवांचे दु:साहस! पंचम जॉर्ज आले तेव्हा भारत नावाच्या देशाचे अस्तित्व नव्हते. नसलेल्या देशाचे ते भाग्यविधाते कसे? स्वतंत्र गणराज्याचे स्वप्न पाहणाऱ्या विवेकानंदांनी, सुचित देशासाठी भारत नाव सुचवले. हे ठाउक असणारेही उथळ रिझोल्यूशनच्या खळखळाटात वाहून जातात. गुरुदेव ऑर्डरप्रमाणे कवन देणारे इंग्रजांचे भाट नव्हते, हे कळत नाही; त्यांना 'भारतभाग्यविधाता' शब्द लोकमताचा आदर सुचवतो, हे कसे कळणार?

वंदे मातरम् या गीताचे महात्म्य सामान्य जनतेस समजावणे आणि जन गण मन हे कवन किंग जॉर्ज समोर म्हणण्याचा पराक्रम करून, गुरुदेव विश्वपटावरून निघून गेले. जिवंत असताना त्यांनी कधी निंदा-स्तुतीची तमा बाळगली नाही. ही चिखलफेक त्यांच्यावर आता परिणाम करणार? हे समर्थन आहे, नव्या पिढीस ऐतिहासिक धुरंधरांचे महात्म्य कळावे यासाठी! सुशिक्षित म्हणवणाऱ्या 'पोपटांच्या' उध्र्वीकरणा-साठीही! भारतीय गणराज्याचा हिरकमहोत्सव थाटाने साजरा झाल्यावर तरी या पायाहीन पूर्वग्रहास नख लागावे; 'जन गण मन' या अजरामर गीताची निर्मिती आणि 'वंदे मातरम्' या गीताचे महात्म्य सामान्य जनतेस समजावणे, हे रास्त श्रेय आहे; त्या गुरूदेवांची नालस्ती थांबवून, शिक्षितांनी सुशिक्षित ठरावे, या सदिच्छेपोटी हा कळवळासूचक आटापिटा! देशाचे राष्ट्रगीत आणि राष्ट्रीयगीत दोन्हीस ज्यांचा परिसस्पर्श लाभला, त्या गुरुदेव टागोरांना मानवंदना देण्यासाठीही!

हा लेख संपवताना एक उल्लेख आवश्यक वाटतो. सर्व भारतीयांना अभिमान वाटण्याजोगी आणि या माहितीपूर्ण लेखास पूरक ठरण्याजोगी ही माहिती! २०१० सालच्या पूर्वार्धात, युनेस्कोने इंडिअन राष्ट्रगीत जगातील सर्वोत्तम राष्ट्रगीत असल्याचे जाहीर केले आहे. (UNESCO announces INDIAN NATIONAL ANTHEM as the BEST National Anthem in the World)

smitacap@gmail.com

(पूर्वप्रसिध्दी : 'रंगदीप' २०१२)